सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई यांचे कार्यालय

Office of the Sr. Inspector of Police, Kandivali Police Station, Mumbai.
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयासमोर, पारेख नगर, एस.व्ही.रोड, कांदिवली पश्चिम, मुंबई ४०० ०६७
Opp. Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar Hospital, Parekh Nagar, S.V.Road, Kandivali - West, Mumbai- 400 067
Email ID:- ps.kandivali.mum@mahapolice.gov.in Phone 022-28056603/28657922/2805090

दिनांक ०५/११/२०२६

प्रेस नोट

ज्वेलर्सच्या दुकानातून ग्राहक बनून सोन्याची चेन चोरी करणाऱ्या आरोपीला नवी दिल्ली येथून अटक करुन चोरी केलेली मालमत्ता हस्तगत केलेबाबत.

दि. १५/११/२०२५ रोजी कांदिवली पोलीस ठाणे हद्दीत पद्मावती ज्वेलर्स, मथुरादास रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई या ज्वेलर्सच्या दुकानात अनोळखी इसमाने ग्राहक बनून ४३.२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन पहाण्याच्या बहाण्याने घेवून संधी साधून चैन घेवून पळून गेला. फिर्यादी श्रीमती प्रीती दीपक साकरिया, वय ५० वर्षे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कांदिवली पोलीस ठाणे येथे गुरक्र ८७८/२०२५, कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासादरम्याने तपासी अधिकारी संदीप गोरडे व तपास पथकाने घटनास्थळावरील तसेच आजूबाजूचे परिसरातील सीसीटीव्हि फूटेजची पहाणी करुन नमूद आरोपी रहात असलेल्या डॉमेटरी येथे सादर केलेले आधारकार्ड व मोबाईल क्रमांक प्राप्त केले. परंतू सदर मोबाईल बंद असल्याचे आढळून आल्याने तसेच सदर पाहिजे आरोपीताविषयी कोणतीही माहिती नसताना तांत्रिक तपासाद्वारे आरोपीताचा शोध घेऊन त्यास दिनांक २८/१०/२०२६ रोजी उत्तम नगर, नवी दिल्ली या परिसरातून ताब्यात घेऊन अटक करण्यात आले. तपासादरम्यान अटक आरोपीताकडे चोरीस गेलेल्या मालमत्तेच्या अनुषंगाने अधिक चौकशी केली असता त्याने गुन्ह्यात चोरी केलेली मालमत्ता त्याचे रहाते घरी असल्याचे सांगितल्यावरुन सदर मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. अटक आरोपी सध्या पोलीस कोठडी मध्ये आहे. अटक आरोपीताने यापूर्वी अश्याचप्रकारचे गुन्हे केले आहेत किंवा कसे याबाबत अधिक तपास चालू असून सदर गुन्हे उघडकीस आणण्यात येत आहे.

अटक आरोपीचे नाव व पत्ता:- सतिशकुमार कृष्णाप्रसाद केशरी, वय ४२ वर्षे, धंदा-नाही, रा.ठि- आर झेड बी १७, महेंद्र पार्क, उत्तम नगर, जिल्हा द्वारका, नवी दिल्ली.

सदरची कामगिरी मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. मनोजकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मुंबई, मा. श्री. शशीकुमार मीना, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री. संदीप घुगे, पोलीस उप आयुक्त, उत्तर परि.-२, मुंबई, मा. श्री. संतोष धनवटे, सहाय्यक पोलीस आयुक्त, बोरीवली विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली श्री. करण सोनकवडे, वपोनि, कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई, श्री. शेखर शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) तसेच तपासी अधिकारी पोउनि संदीप गोरडे व प्रकटीकरण पथकातील सफौ गोरखनाथ पवार, सफौ महादेव नावगे, पोह प्रविण जोपळे, राजेंद्र गौतम, कृष्णदेव केसरे, पोशि जोगलपूरे, प्रविण वाघमारे यांनी करुन सदर गुन्हा उघडकिस आणुन नमूद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उल्लेखनीय कामगीरी केली आहे.

